ePaper
भारत स्वत:चा उदय स्वत: करेल; भारताने अमेरिकेला ठणकावलं!

वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 08 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






## सिलिंडर महागले, कच्च्या तेलाच्या आयातीबाबत सरकारकडून मोठी माहिती

# पेट्रोल-डिझेलही महागणार?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इराणविरोधात अमेरिका आणि इस्रायलने पुकारलेल्या युद्धाचा भडका भारतात उडाला आहे. भारतात १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत ६० रुपयांनी तर व्यावसायिक सिलिंडर सुमारे ११५ रुपयांनी महागले आहे. आखाती देशांत सुरू असलेल्या संघर्षामुळे संपुर्ण जगभरात ऊर्जा संकट ओढवू शकते, अशी शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढल्यानंतर आता पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढण्याची शक्यता असताना केंद्र सरकारने याबाबत स्पष्टता दिली आहे.**




LPG च्या दरवाढीबाबत काँग्रेसने केलेल्या आरोपांवर सरकारी सूत्रांनी म्हटले आहे की, “त्यांचे आरोप पूर्णपणे बिनबुडाचे आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या संदर्भातच भाष्य करण्यात आले होते, LPG बाबत नाही. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढणार नाहीत, असे आश्वासन आम्ही आज पुन्हा देतो.”

दरम्यान, शेजारील राष्ट्रांवर हल्ला करणार नाही, अशी भूमिका इराणने घेतली असल्याने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून पुन्हा मालवाहू जहाजांची ये जा सुरू होण्याची शक्यताही सरकारी सूत्रांनी व्यक्त केली. त्यामुळे इंधनसाठ्याबाबत चिंता व्यक्त करण्याची गरज नसल्याचे सूतोवाच करण्यात आले आहे.



## ऊर्जा साठ्याची स्थिती सुधारत आहे

“आमच्या आढावा बैठकींमध्ये असे दिसून येत आहे की, आपल्या ऊर्जा साठ्याची (ENERGY STOCKS) स्थिती आता सुधारत आहे. एका टप्प्यावर आम्हाला LPG (घरगुती गॅस) साठ्याबद्दल चिंता वाटत होती, परंतु आता आपण अधिक चांगल्या स्थितीत आहोत. कतारने आम्हाला आश्वासन दिले आहे की, जसा मार्ग पुन्हा मोकळा होईल, तसा ते भारताला होणारा पुरवठा पुन्हा सुरू करतील. आपल्याकडे LNG चा अतिरिक्त साठा उपलब्ध आहे आणि अनेक देशांकडून आपल्याला LNG पुरवठ्यासाठी प्रस्ताव (OFFERS) मिळाले आहेत”, असंही सूत्रांकडून समोर आलं आहे. कतार हा भारताचा सर्वात मोठा LNG पुरवठादार आहे. अलीकडील तणावामुळे तिथून होणारा पुरवठा काही काळ विस्कळीत झाला असला, तरी भारत आता रशिया आणि इतर देशांकडून LNG घेण्याच्या पर्यायावर विचार करत आहे.

## इतर स्त्रोतांकडून कच्च्या तेलाच्या आयातीत वाढ

भारतातील ऊर्जा साठ्याची स्थिती सध्या सुधारत असून त्यामुळे देशाचा आत्मविश्वास अधिक बळकट होत आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढणार नाहीत, अशी ग्वाही देण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि युद्धजन्य तणाव लक्षात घेता भारताने कच्च्या तेलाच्या आयातीचे स्रोत अधिक विविध केले आहेत. विशेषतः हॉर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे होणाऱ्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी इतर मार्गांचा वापर वाढवण्यात आला आहे. यापूर्वी या सामुद्रधुनीव्यतिरिक्त इतर मार्गांनी होणारी कच्च्या तेलाची आयात सुमारे ६० टक्के होती; ती आता वाढून ७० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. या धोरणात्मक निर्णयामुळे ऊर्जा पुरवठा अधिक सुरक्षित राहणार असून देशांतर्गत इंधन बाजारावर अचानक परिणाम होण्याची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे नागरिकांवर इंधन दरवाढीचा तातडीचा भार पडणार नसल्याचे संकेत सरकारी सूत्रांनी दिले आहेत.

# इंदापुरचा कारभार 'राष्ट्रवादी'च्या हाती

## पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेतेपदी इंदापूरचे श्रीमंत ढोले

**महाईन्यूज । पुणे**

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या पुणे जिल्हा परिषदेचा कारभार हा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी इंदापूर तालुक्याच्या हाती दिल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या गटनेतेपदी इंदापूरमधील जिल्हा परिषद सदस्य श्रीमंत ढोले यांची निवड करण्यात आली आहे. ढोले यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद दिले जाणार की नाही, हे अद्याप स्पष्ट झाले नसले, तरी गटनेता म्हणून आगामी काळात ढोले जिल्ह्यातील कारभार पाहणार आहेत.**






पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये ७३ पैकी ५१ जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला मिळाल्या. जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद कोणाला द्यायचे हे निश्चित झालेले नाही. मात्र, गटनेतेपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ढोले यांची निवड केली आहे. ढोले यांना या पदाची जबाबदारी देण्यासाठी वडगाव मावळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनील शेळके यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर ढोले यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. ढोले हे पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत इंदापूर तालुक्यातून सलग दोन वेळा निवडून आले आहेत.

इंदापूर तालुक्यातील राजकीय समीकरणे आता बदलली आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी' एकत्र येऊन निवडणूक लढवली. राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे एके काळचे राजकीय प्रतिस्पर्धी एकत्र आले आहेत. इंदापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आठ जागांसह पंचायतीच्या १६ जागा जिंकून प्रतिस्पर्धी भाजपच्या सर्व उमेदवारचा पराभव करीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने इंदापूर तालुक्यात ताकद दाखवून दिली. गेल्या विधानसभा निवडणुकीत सुमारे ४० हजार मते घेतलेले प्रवीण माने भाजपमध्ये गेले. त्या पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटातून बाहेर पडत इंदापूरचे माजी नगराध्यक्ष प्रदीप गारटकर हेही भाजपत आले. तत्पूर्वी गारटकर यांनी इंदापूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवली. त्या निवडणुकीत त्यांना अत्यल्प मतांच्या फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले. त्या वेळी झालेल्या आघाडीत हर्षवर्धन पाटील हेही होते. मात्र, पाटील यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत पक्षाबरोबरच राहणे पसंत केले. या तुल्यबळ राजकीय शक्ती एकत्र झाल्याने भाजपच्या उमेदवारांचा निभाव लागला नाही. सर्व उमेदवारांना पराभवाला सामोरे जावे लागले. आता इंदापूर तालुक्यावर 'राष्ट्रवादी'चे वर्चस्व निर्माण झाले आहे. हे वर्चस्व अधिक घट्ट करण्यासाठी जिल्हा परिषदेचे गटनेते पददेखील इंदापूर तालुक्याला देण्यात आल्याची चर्चा आहे.

# अजितदादांचं स्वप्न, फडणवीसांची अर्थसंकल्पात घोषणा

**महाईन्यूज । पुणे**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाची घोषणा केली आहे. तथापि या योजनेसाठी निधीची तरतूद मात्र केली नाही. अर्थसंकल्पात तशी तरतूदच दिसत नाही, असे सांगत ही केवळ घोषणाच असल्याचे सिद्ध होत आहे, असा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला असून हा प्रकल्प नेमका कधी व कसा पुर्ण करणार असा प्रश्न उपस्थित केला आहे.**







मुख्यमंत्र्यांनी काल राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यातील नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाबाबत त्यांनी केलेल्या घोषणेचा उल्लेख करत खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट केले असून ही निव्वळ घोषणा ठरू नये, ठोस निधीची तरतूद करून लवकरात लवकर काम सुरू होण्याच्या दृष्टीने आखणी करण्यात यावी, म्हणजे बारामती आणि पुरंदर तालुक्यातील अवर्षणग्रस्त नागरिकांत संभ्रम राहणार नाही, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

बारामती आणि पुरंदर तालुक्यातील अवर्षणग्रस्त गावांतल्या शेतजमीनी ओलिताखाली आणणे तसेच पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी नीरा व कऱ्हा नदीच्या पाण्याची महत्वाकांक्षी उपसा सिंचन योजना हे स्व. अजितदादा पवार यांचे स्वप्न होते. या योजनेच्या माध्यमातून या भागातील गावांवरील जिरायती भाग हा शिक्का कायमस्वरुपी पुसून टाकणे ला जाणे शक्य आहे. त्यासाठी अजित पवार प्रयत्नशील होते, असे सुळे यांनी म्हटले आहे.

अवघ्या दीड महिन्यांपूर्वी २४ जानेवारी २०२६ रोजी बारामती तालुक्यातील कण्हेरी याठिकाणी झालेल्या जाहीर सभेत अजित पवार यांनी या योजनेचा उल्लेख केला होता. आपण या योजनेसाठी १ हजार कोटी रुपयांची तरतूद करत असून त्या माध्यमातून सुमारे अडीच टीएमसी पाणी साठविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले होते. दुर्दैवाने आज आपल्यात अजित पवार नाहीत. त्यांच्या जागी अर्थमंत्री या नात्याने फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी विविध प्रकल्पांची घोषणा केली. अगदी नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाचा सुद्धा त्यांनी उल्लेख केला मात्र त्यासाठीच्या निधीच्या तरतुदींचा उल्लेख मात्र केला नाही, ही बाब खासदार सुप्रिया सुळे यांनी लक्षात आणून दिली आहे.

राज्यातील इतर सिंचन प्रकल्पांच्या घोषणा मुख्यमंत्र्यांनी निधीसहीत केल्या आहेत. यात बारामती आणि पुरंदर तालुक्यासाठी अतिशय महत्त्वाच्या असलेल्या नीरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाबाबत मात्र त्यांनी निव्वळ घोषणाच केल्याचे दिसते आहे. त्यामुळे शासनाची या प्रकल्पाबाबत नेमकी काय भूमिका आहे, याबाबत जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे सुद्धा खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

हा प्रकल्प या भागातील शेतकरी बांधवांसाठी अतिशय महत्वाचा असून या माध्यमातून येथील जमीन ओलिताखाली येणार आहे. तसेच पिण्याचे पाणी देखील उपलब्ध होणार आहे. या भागातील नागरीकांची होणारी सोय आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता हा प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी शासनाने भरीव तरतूद करावी, अशी मागणी सुद्धा खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.


# पिंपरी-चिंचवड बनतेय जी.सी.सी हब

## एमएसएमई केंद्र, नवे रस्ते-रेल्वे प्रकल्प आणि स्टार्टअप योजनांमुळे मोठी चालना

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुण्याबरोबर वाढते औद्योगिक केंद्र म्हणून विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवड परिसरात ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी देशातील महत्त्वाचे केंद्र बनत आहे. या माध्यमातून मोठा रोजगार उपलब्ध होऊ शकेल. विशेषतः प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. त्यामुळे कुशल रोजगार निर्मितीचे लक्ष ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून 4 लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकेल. तसेच, आयटी व अभियांत्रिकी क्षेत्रातील तरुणांना फायदा होणार आहे. दरम्यान, या अर्थसंकल्पाचे शहरातील उद्योगक्षेत्रातून स्वागत करण्यात आले.**

औद्योगिक दृष्ट्या वेगाने विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरासाठी राज्याच्या नव्या उद्योग धोरणाचा मोठा लाभ होणार आहे. या धोरणाअंतर्गत राज्यभरात १८ अतिविशाल औद्योगिक केंद्र उभारण्याचे नियोजन असून, त्यातून सुमारे ५० लाख रोजगारनिर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तसेच अर्थसंकल्पात प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग उपक्रम आयुक्तालय आणि सेवा आयुक्तालय स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे. हे आयुक्तालय पिंपरी-चिंचवड शहरात स्थापन झाल्यास औद्योगिक वाढ, गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधींमध्ये मोठी भर पडेल. विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराला या निर्णयाचा सर्वाधिक फायदा होण्याची शक्यता असून, उद्योग, कौशल्यविकास आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला नवी गती मिळेल.




### तंत्रज्ञानाभिमुख तरुणांसाठी संधी



पुण्यातील स्टार्टअप इकोसिस्टमला चालना देण्यासाठी 50 हजार स्टार्टअप्सना सहाय्य तसेच गेमिंग उद्योगासाठी 295 हून अधिक स्टुडिओ उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्याचा लाभ हा पिंपरी-चिंचवडमधील तंत्रज्ञानाभिमुख तरुणांसाठी ही मोठी संधी ठरणार आहे. या माध्यमातून 4 लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकेल सध्याच्या आयटी आणि एआय युगात तरुणांसाठी मोठा पर्याय उपलब्ध आहे.

### रेल्वे प्रवाशांना दिलासा

पुणे-लोणावळादरम्यान तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन उभारण्यासाठी सुमारे 5,100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवड, आकुर्डी आणि तळेगाव येथील नोकरदार, विद्यार्थी तसेच औद्योगिक क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे. लोकल गाड्यांची संख्या वाढण्यासही मदत होणार आहे. दरम्यान, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यासाठी रेल्वे प्रवासी संघ, पिंपरी चिंचवड प्रवासी संघटना या माध्यमातून राज्यातील मंत्रीपासून ते केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडून पाठपुरावा केला आहे. दरम्यान, या निर्णयामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणखी बळकट होण्यास मदत होईल.

### रस्ते प्रकल्पाचे महत्त्वाचा टप्पा

औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात निधी जाहीर करण्यात आला आहे. नाशिक फाटा–खेड मार्गासाठी ७,८०८ कोटी, तळेगाव–चाकण–शिक्रापूर मार्गासाठी ४,००० कोटी आणि पुणे–शिरूर मार्गासाठी ७,५१५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परिणामी उद्योगांना आवश्यक असलेली वाहतूक सुविधा मजबूत होऊन गुंतवणुकीला चालना मिळेल. व्यवसायवृद्धीला गती मिळत रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. या पायाभूत सुविधा विकासामुळे उद्योगनगरीतील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि कार्यक्षम बनणार आहे.

# महापौर निधी पुन्हा सुरू, रुग्णांना आर्थिक मदत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रशासकीय राजवटीत तब्बल चार वर्षे बंद असलेला पिंपरी चिंचवड महापालिकेचा महापौर निधीचे वितरण पुन्हा सुरू करण्यात आले आहे. एका रुग्णाला मदत म्हणून पाच हजार रुपयांचा धनादेश वाटपास सुरुवात केली आहे, असे महापौर रवी लांडगे यांनी शुक्रवार (दि. 6) रोजी सांगितले.**




महापौर रवि लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टची धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केली. ट्रस्टचे अध्यक्ष महापौर असून, ट्रस्टमध्ये उपमहापौर शर्मिला बाबर (उपाध्यक्ष), सहआयुक्त (सचिव), मुख्य लेखापाल (खजिनदार), स्थायी समितीचे अध्यक्ष, विधी समितीचे सभापती, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, मुख्य लेखा परीक्षक व क्रीडा विभागाचे उपायुक्त (सदस्य) यांचा समावेश आहे. तसेच, आयुक्तांनी त्या ट्रस्टच्या नावाने सन 2026-27च्या अर्थसंकल्पात 5 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे शहरातील गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांना पाच हजार रुपयांची आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यासंदर्भात महापौर लांडगे यांनी सांगितले की, शहरातील गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांची आर्थिक होरपळ होऊ नये म्हणून तातडीने कार्यवाही करीत बंद असलेला ट्रस्ट पुन्हा सुरू करण्यात आला आहे. तसेच, अर्थसंकल्पात 5 कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे. रुग्णांना आर्थिक मदत देण्यास सुरूवात केली आहे. त्याचा पहिला धनादेश तयार करण्यात आला आहे. येत्या सोमवारी (दि.9) रुग्णास धनादेश दिला जाईल. या निधीसंदर्भात शहरातील गोरगरीब रुग्णांनी महापौर कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहनही महापौरांनी केले आहे. ती मदत तुटपुंजी असून, त्यात वाढ करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, अर्थसंकल्पात महापौर विकास निधीसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, असे शहराचे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.



## भूमिका

**महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचा विषय सामान्यतः आकडे, महसूल, तूट, कर्ज आणि व्याज या कोरड्या संज्ञांभोवती फिरणारा असतो. पण अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा ताळेबंद नसतो; तो राज्याच्या स्वप्नांचा, आशेचा आणि विकासाच्या दिशेचा आराखडा असतो. म्हणूनच अनेकदा अर्थसंकल्प मांडताना वातावरणात थोडी काव्यात्म छटा आणण्याचा प्रयत्न केला जातो.**

# महाराष्ट्राच्या डोळ्यांतली स्वप्ने

या परंपरेला अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाचा अर्थसंकल्प सादर करताना आपल्या भाषणात शेरोशायरीचा सुंदर वापर केला. 'डर मुझे भी लगा फासला देखकर, पर मैं बढता गया रास्ता देखकर। खुद-ब-खुद मेरे नजदिक आ गयी, मंजिल मेरा हौसला देखकर।' या ओळींमधून त्यांनी आव्हानांना सामोरे जाण्याची जिद्द आणि आत्मविश्वास व्यक्त केला.



आज महाराष्ट्र एका मोठ्या स्वप्नाचा पाठलाग करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय ठेवले आहे आणि त्या प्रवासात महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. देशातील क्रमांक एकचे राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. देशाच्या सुमारे दहा टक्के लोकसंख्या आणि जवळपास तितकेच क्षेत्रफळ असलेल्या या राज्याचा देशाच्या एकूण सकल उत्पन्नात सुमारे चौदा टक्क्यांहून अधिक वाटा आहे. आगामी काळात हा वाटा अधिक वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. २०४७ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे स्वप्न राज्याने पाहिले आहे.

या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करताना बदलत्या जगाशी जुळवून घेणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वेगाने विस्तार होत असताना कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयचा वापर विविध क्षेत्रांत वाढवणे ही काळाची गरज आहे. राज्याला अधिक डिजिटल बनवणे, सायबर सुरक्षा बळकट करणे आणि राज्याचा डेटा सुरक्षित ठेवणे ही देखील महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. या सर्वांसोबतच मोठमोठे पायाभूत प्रकल्प राबविण्याचे नियोजन सरकारने केले आहे. समृद्धी महामार्गानंतर आता शक्तिपीठ महामार्गाचे स्वप्न राज्यासमोर ठेवण्यात आले आहे.

पाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीने वैनगंगा-नळगंगा या दोन नदीखोऱ्यांच्या जोडणीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याची योजना आहे. त्याचबरोबर राज्यात इतर लहान-मोठे नदीजोड प्रकल्पही राबवले जाणार आहेत. शहरी विकासाच्या दृष्टीने मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरांमध्ये मेट्रो रेल्वेचे जाळे आणखी विस्तारण्याचा मानस आहे. वाढत्या लोकसंख्येचा आणि शहरीकरणाचा विचार करून तिसरी-चौथी मुंबई किंवा दुसरे पुणे आणि दुसरे नागपूर विकसित करण्याची संकल्पनाही पुढे येत आहे.

महाराष्ट्राचा विकास केवळ काही मोजक्या शहरांपुरता मर्यादित राहू नये, यासाठी मागास जिल्ह्यांनाही विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर भर दिला जात आहे. गडचिरोलीसारखा जिल्हा देशाचा स्टील हब म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. उद्योग, रोजगार आणि पायाभूत सुविधा या माध्यमातून राज्यातील सर्व भागांचा समतोल विकास घडवून आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. मात्र या सर्व विकासाच्या स्वप्नांसोबत वास्तवाचे भान ठेवणेही तेवढेच आवश्यक आहे. राज्यातील अनेक शेतकरी आजही कर्जबाजारी आहेत आणि दररोज काही शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असल्याची वेदनादायक परिस्थिती आहे. कर्जमाफीसाठी आंदोलनेही झाली आहेत. दुसरीकडे महायुतीला सत्तेत आणण्यात मोठा वाटा असलेल्या महिला मतदारांच्या अपेक्षाही मोठ्या आहेत. 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत मिळणारी पंधराशे रुपयांची मदत कधी वाढून एकवीसशे होईल, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

## प्रासंगिक »

### बळी तो कान पिळी

***एकदा प्राण्यांमध्ये रोगाची साथ सुरू होऊन हजारो प्राणी मरू लागले. आपण फार पाप केल्यामुळे देवाने हा कोप केला आहे असे सर्व प्राण्यांना वाटून त्यांनी आपली वाईट कृत्ये कबूल करायचे ठरविले***

जो सर्वात मोठा अपराधी ठरेल त्याने देवाच्या कोपाला शांत करण्यासाठी बळी जावे असे ठरले. ठरल्या वेळी सगळेजण हजर झाले व न्यायाधीशाच्या जागी एक-मताने कोल्ह्याची निवड केली गेली. प्रथम सिंहाने पुढे होऊन कबुली दिली, 'मी फार गरीब कोकरांना ठार मारलं, एवढंच नव्हे तर फार भूक लागल्याने एका धनगरालाही ठार मारून खाल्लं.' त्यावर न्यायाधीश म्हणाले, 'एखाद्या सामान्य प्राण्याने अशा गोष्टी केल्या असत्या तर नक्कीच मोठा अपराध ठरला असता. पण महाराजांना इतरांपेक्षा जास्त सवलती असतात. न्यायाधीश झालेले कोल्होबा ओरडले. 'अरे पाप्या नक्कीच तुझ्या पापामुळे सध्या हा देवाचा कोप झालेला आहे. यालाच मरणाची शिक्षा योग्य आहे !' असा निकाल कोल्होबांनी देताच सगळ्यांनी मिळून गाढवाला ठार मारले.

तात्पर्य : ज्याच्याकडे ताकद आहे तोच इतरांना वाकवतो किंवा त्रास देतो.

शरद पवार दहाव्या वेळी संसदेवर जात आहेत. सहा वर्षांची राज्यसभेची ही मुदत संपेल तेव्हा ते साधारण एक्याण्णव वर्षांचे असतील. अविरत लोकसेवेची इतकी तीव्र इच्छा सातत्याने टिकवून ठेवणं हे कौतुकास्पदच म्हणायला हवे.

# झाकली मूठ सव्वा लाखाची

समाजमाध्यमांवर तसेच राजकीय वर्तुळात अनेक जण असा सवाल करत आहेत की, या वयात शरद पवार यांनी पुन्हा राज्यसभेवर जाण्याचा निर्णय का घेतला? पण खरा मुद्दा केवळ त्यांच्या इच्छेचा नाही, तर महाविकास आघाडीच्या राजकीय परिस्थितीचा आहे. कारण ज्या महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून ते निवडणूक लढवणार आहेत, त्या आघाडीकडे शरद पवार यांच्याशिवाय दुसरा सक्षम उमेदवार नव्हता का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो.



राज्यसभेच्या निवडणुकीत मतदान करताना आमदारांना पक्षाने नियुक्त केलेल्या अधिकृत प्रतिनिधीला मत दाखवून मतदान करावे लागते. त्यामुळे पक्षांतर किंवा मतफुटीची शक्यता कमी असते. तरीसुद्धा महाविकास आघाडीच्या नेतृत्वाला आपल्या मतांबाबत काहीशी शंका वाटत होती का, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

२०२२ मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीची आठवण येथे प्रकर्षाने येते. त्या वेळी शिवसेनेचे अधिकृत उमेदवार संजय पवार यांच्या मतांमध्ये सहा मतांची घट झाली होती. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ही मते अपक्षांची असल्याचे सांगून परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्या घटनेने राज्यातील राजकीय समीकरणे किती अनिश्चित असू शकतात, याची जाणीव सर्वांनाच झाली होती.

त्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर आज महाविकास आघाडीने शरद पवार यांनाच उमेदवारी देणे हा एक प्रकारे सुरक्षित पर्याय मानला गेल्याचे दिसते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि राजकीय वजनाचा विचार करता, आघाडीतील सर्व घटक पक्षांना एकत्र ठेवण्यासाठीही ही निवड उपयोगी ठरू शकते.

दरम्यान, अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) काही नेत्यांकडून अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटासोबत विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू असल्याचे संकेत मिळाले होते. त्या पार्श्वभूमीवर पक्षातील अंतर्गत घडामोडी आणि आघाडीतील राजकारण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे. या सर्व परिस्थितीत काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनीही शरद पवार यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीने आपल्या मतांची एकजूट कायम ठेवत राजकीय प्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. अखेर, या निर्णयामागे राजकीय गणिते आणि अनुभवाचा आधार अधिक असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

## ।। अभंगवाणी ।।



॥ आम्ही जातो अमुच्या गावा ॥
॥ आमचा राम राम घ्यावा ॥ १ ॥

॥ तुमची आमची हेचि भेटी॥
॥ येथुनिया जन्मतुटी ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वैश्विक शांततेसाठी पुढाकार घ्यावा

## अण्णा हजारे यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र, दिला महत्त्वाचा सल्ला

**महाईन्यूज । मुंबई**

**संपूर्ण जग सध्या अत्यंत चिंताजनक परिस्थितीचा सामना करत आहे. जगातील देशांमधील वाढत्या तणाव आणि संघर्षांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन अधिकाधिक असुरक्षित होत चालले आहे. अलीकडील घटनांचा निष्पाप महिला, मुले आणि कुटुंबांवर होणाऱ्या परिणाम अत्यंत दुःखद आणि वेदनादायक आहे.**





भारताची संस्कृती अहिंसा आणि शांततेची आहे. आपला देश नेहमीच जगाला संवाद आणि शांततेचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करत आला आहे. अशा वेळी, भारतासारख्या मोठ्या लोकशाही राष्ट्राने मानवता आणि शांततेचा संदेश देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

अमेरिका आणि इस्रायल या देशांनी इराणवरील हल्ले अद्यापही सुरूच ठेवले आहेत. इराणही याला प्रत्युत्तर देत असून, आखाती देशांमधील तणाव वाढत चालल्याचे चित्र आहे. दुबईसह अनेक ठिकाणची परिस्थिती आणखी बिकट होत चालली आहे. या युद्धामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झालेला आहे. इंधन संकट उभे राहिले आहे. भारताला याचा मोठा फटका बसताना पाहायला मिळत आहे. या अनेक घटनांच्या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून, शांततेसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे.

तुमच्या नेतृत्वाखाली भारताने अनेक जागतिक मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका बजावली आहे. म्हणूनच, या संवेदनशील वेळी, जर भारत मानवता आणि शांततेच्या समर्थनार्थ पुढे आला तर ते संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी ठरेल. मानवतेच्या हितासाठी आणि निष्पाप नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी भारताने शांततेचा मार्ग अवलंबावा अशी माझी नम्र अपेक्षा आहे, असे अण्णा हजारे यांनी सांगितले.

### जगाला शस्त्रांची नाही तर विश्वास आणि संवादाची गरज

आज जगाला शस्त्रांची नाही तर विश्वास आणि संवादाची गरज आहे. युद्ध केवळ विनाशाकडे नेत असते, तर संवादामुळे तोडगा आणि स्थिरतेचा मार्ग मोकळा होतो. म्हणून, मी नम्रपणे विनंती करतो की, भारताने तटस्थ आणि जबाबदार भूमिका बजावत जागतिक स्तरावर शांतता आणि संवादाला चालना देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे अण्णा हजारे यांनी म्हटले आहे.

## ‘मास्टरशेफ इंडिया 2026’ चा किताब नागपूरच्या गंधे ब्रदर्सकडे

**महाईन्यूज । नागपूर**

**‘मास्टरशेफ इंडिया सीझन ९’ या कुकिंग शोचा ग्रँड फिनाले सोहळा नुकताच पार पडला. यंदा या शोमध्ये पहिल्यांदाच एका मराठमोळ्या जोडीने बाजी मारली आहे. अजिंक्य गंधे आणि विक्रम गंधे हे दोघे भाऊ मूळचे नागपूरचे. या दोघांनी यावर्षीचा ‘मास्टरशेफ’ खिताब जिंकला आहे. सध्या संपूर्ण देशभरातून गंधे ब्रदर्सवर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.**



विक्रम गंधे सध्या ३१ वर्षांचा आहे. त्याने सिटी प्रीमियर महाविद्यालयातून कॉमर्स शाखेतून आपलं शिक्षण पूर्ण केलं होतं. यानंतर विक्रम फॅमिली बिझनेस सांभाळत होता. तर, २९ वर्षीय अजिंक्य गंधेने आर्किटेक्चर आहे. या दोघांना लहानपणापासूनच स्वयंपाकाची आवड होती.

विक्रम गंधे अनेक वर्षे त्यांचा फॅमिली बिझनेस सांभाळत होता. पण, करोना काळात परिस्थिती बदलली. बिझनेस सोडून या दोन्ही भावांनी स्वतःची आवड जपण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयात कुटुंबाने मोठी साथ दिली. यानंतर दोघांनी नागपूरमध्ये स्वतःचा कॅफे सुरू केला. पण, यांना खरी ओळख मास्टरशेफमुळे मिळाली. आता गंधे ब्रदर्स घराघरांत पोहोचले आहेत.




शोमध्ये पहिल्या दिवसापासून गंधे ब्रदर्सची कामगिरी उत्तम राहिली होती. विकास खन्ना, रणवीर ब्रार आणि कुणाल कपूर या तिन्ही सेलिब्रिटी शेफनी त्यांचं नेहमीच कौतुक केलं. अखेरीस गंधे ब्रदर्सची सगळी मेहनत फळाला आली आणि त्यांनी हा शो जिंकला. यंदा अंजू प्रधान आणि मंजू ओझा या बहिणींची जोडी मास्टशेफची पहिली उपविजेती जोडी ठरली आहे. तर, चंदना आणि साई श्री राचकोंडा या आई-मुलीची हैदराबाद येथील जोडी द्वितीय उपविजेती ठरलीये.

गंधे ब्रदर्सला हा शो जिंकल्यावर त्यांना बक्षीस म्हणून जवळपास २५ लाख रुपये आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आली. याशिवाय या दोघांना ‘GOLDEN APRON’ देखील दिला आहे. या दोन्ही भावांवर संपूर्ण महाराष्ट्रातून कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यापूर्वीच या दोघांच्या पाककौशल्याचं सोशल मीडियावर कौतुक केलं होतं.

### नागपूरच्या गंधे ब्रदर्सची कामगिरी

विक्रम आणि अंजिक्य गंधे हे महाराष्ट्रातील नागपूरचे रहिवासी आहेत. दोन्ही भाऊ ‘गंधे ब्रदर्स’ म्हणून ओळखले जातात. लहानपणापासूनच दोघांनाही स्वयंपाकाची प्रचंड आवड होती. त्यामुळे त्यांनी याच क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला. अंजिक्य गंधे हे व्यावसायिकदृष्ट्या आर्किटेक्ट आहेत. त्यांनी या क्षेत्रात प्रशिक्षण घेतले होते, पण खाद्यपदार्थांबद्दलचा त्यांचा उत्साह वाढतच गेला. त्यामुळे त्यांनी गोव्यात जाऊन फूड क्षेत्रात काहीतरी करण्याचा निर्णय घेतला.

### कुकिंग व्यवसायात आजमावले नशीब

अंजिक्यने गोव्यात २४ व्या वर्षी स्वतःचा कॅफे सुरू केला. पुढे तो कॅफे यशस्वी व्यवसायात बदलला. नंतर मोठा भाऊ विक्रम गंधेही त्यांच्यासोबत या व्यवसायात सहभागी झाला. मात्र विक्रमने अंजिक्यच्या आधीच कुकिंगची वाट निवडली होती. त्यांनी अवघ्या १९ व्या वर्षी स्वतःची कॅन्टीन सुरू केली होती. यानंतर दोन्ही भाऊ एकत्र आले आणि त्यांनी नागपुरात ‘प्लेस बेकहाउस’ नावाचे कॅफे व रेस्टॉरंट सुरू केले. सध्या ते दोघे मिळून हा व्यवसाय चालवतात. त्यांच्या खास आणि वेगळ्या पद्धतीने तयार केलेल्या डिशेस ग्राहकांना खूप आवडतात.

# भारताने अमेरिकेला ठणकावलं!

## भारत स्वतःचा उदय स्वतः करेल; एस. जयशंकर यांचा अमेरिकेला स्पष्ट संदेश

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आणि अमेरिकेतील बहुप्रतीक्षित व्यापार करारावर काही दिवसांपूर्वी शिक्कामोर्तब झालं. याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही अनेकदा भाष्य केलं. एवढंच नाही तर त्यानंतर अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क ५० टक्क्यांऐवजी १८ टक्के करण्याचा निर्णय घेतला. मात्र, आता भारत-अमेरिका व्यापार कराराच्या अनुषंगाने अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांनी नुकतंच केलेलं एक वक्तव्य चर्चेत आलं आहे.**



'भारत आणि अमेरिका व्यापार करारामध्ये अमेरिका राष्ट्रीय हीत प्रथम ठेवणार असून आम्ही २० वर्षांपूर्वी चीनशी केलेल्या चुका आता भारतासोबत होऊ देणार नाहीत', असं ख्रिस्तोफर लँडौ यांनी म्हटलं होतं. दरम्यान, ख्रिस्तोफर लँडौ यांच्या या वक्तव्याला आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

'भारताचा उदय दुसरं कोणी ठरवू शकत नाही. भारत स्वतःचा उदय स्वतः करेल', अशा शब्दांत भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांना ठणकावलं आहे.

"अमेरिका भारताबरोबरच्या व्यापार करारामध्ये 'अमेरिका फर्स्ट' हेच धोरण अवलंबवणार आहे. भारताबरोबर आर्थिक संबंध आणि व्यापार वाढवताना अमेरिका स्वत:च्या राष्ट्रीय हितांना प्राधान्य देईल आणि दोन दशकांपूर्वी केलेल्या चुका टाळेल. २० वर्षांपूर्वी आम्ही चीन संदर्भात केलेल्या चुका आता भारतासोबत होऊ देणार नाही. कारण अमेरिकेने तेव्हा आपल्या बाजारपेठा खुल्या केल्या होत्या आणि त्यानंतर विविध क्षेत्रांत चीनने अमेरिकेला मागे टाकलं. त्यामुळे आता अमेरिका फर्स्ट हेच धोरण आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचं प्रशासन राष्ट्रीय हिताला सार्वभौम राज्यांमधील सामायिक तत्व मानतं. जसं राष्ट्राध्यक्ष ट्रम्प अमेरिकेला पुन्हा महान बनवू इच्छित आहेत. तसेच भारताचे पंतप्रधान किंवा इतर नेत्यांकडून त्यांचे देश पुन्हा महान बनवण्याची अपेक्षा करतील", असं ख्रिस्तोफर लँडौ यांनी म्हटलं होतं.

### एस. जयशंकर काय म्हणाले?

अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांनी केलेल्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी म्हटलं की, "जागतिक स्तरावर भारताचा उदय इतर देशांच्या चुकांमुळे नव्हे तर स्वतःच्या क्षमतेमुळे होईल. भारताचा उदय भारतच निश्चित करेल आणि तो आपल्या ताकदीने निश्चित केला जाईल, इतरांच्या चुकांनी नाही."

## राम रहीमची जन्मठेपेची शिक्षा रद्द; पत्रकार हत्या प्रकरणात निर्दोष मुक्तता

**महाईन्यूज । पंजाब**

**साध्वी लैंगिक शोषण प्रकरण चव्हाट्यावर आणणारे धाडसी पत्रकार रामचंद्र छत्रपती यांच्या हत्येप्रकरणी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने आज ऐतिहासिक निकाल दिला. कनिष्ठ न्यायालयाने डेरा प्रमुख गुरमीत राम रहीम याला सुनावलेली जन्मठेपेची शिक्षा उच्च न्यायालयाने रद्द केली असून, पुराव्याअभावी त्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.**



रामचंद्र छत्रपती यांनी २००० मध्ये आपली वकिली सोडून सिरसा येथे पूरा सच नावाचे वृत्तपत्र सुरू केले होते. २००२ मध्ये त्यांच्या हाती एक निनावी पत्र लागले, ज्यात डेरा सच्चा सौदाच्या आश्रमात साध्वींचे लैंगिक शोषण होत असल्याचा खळबळजनक खुलासा करण्यात आला होता. जीवाला धोका असूनही छत्रपतींनी ते पत्र छापले.

१९ ऑक्टोबर २००२ रोजी राहत्या घराबाहेर त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. २१ ऑक्टोबर रोजी दिल्लीच्या अपोलो रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. रामचंद्र छत्रपतींच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा अंशुल छत्रपती यांनी वयाच्या २१ व्या वर्षी या प्रकरणाचा पाठपुरावा केला आणि सीबीआय तपासाची मागणी लावून धरली.

११ जानेवारी २०१९ रोजी पंचकुला येथील विशेष सीबीआय न्यायालयाने राम रहीमला हत्येच्या कटाचा दोषी ठरवत जन्मठेप सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयाने आता हा निकाल फिरवला आहे. हायकोर्टाने राम रहीमच्या विरोधातील पुरावे पुरेसे नसल्याचे मानले. या प्रकरणातील सह आरोपी कुलदीप, निर्मल आणि कृष्ण लाल यांची जन्मठेपेची शिक्षा मात्र कायम ठेवण्यात आली आहे.

राम रहीम जरी या प्रकरणातून सुटला असला, तरी २०१७ मध्ये लागलेल्या साध्वी बलात्कार प्रकरणात तो २० वर्षांची शिक्षा भोगत आहे. त्यामुळे तो सध्या रोहतकच्या सुनारिया जेलमध्येच राहणार आहे.

रामचंद्र छत्रपतींनी ज्या बलात्कार प्रकरणाचा पाया रचला होता, त्याच प्रकरणात ऑगस्ट २०१७ मध्ये राम रहीमला दोषी ठरवण्यात आले होते.

### नेमकं प्रकरण काय?

पत्रकार रामचंद्र छत्रपती 'पूरा सच' हे वृत्तपत्र चालवत होते, त्यांची ऑक्टोबर २००२ मध्ये हरियाणातील सिरसा येथील त्यांच्या घराबाहेर गोळ्या घालून हत्या करण्यात आली. त्यांच्या प्रकाशनात डेरा सच्चा सौदा मुख्यालयात महिला अनुयायांचे लैंगिक शोषण होत असल्याचा आरोप करणारे एक निनावी पत्र प्रकाशित झाल्यानंतर हा हल्ला झाला.

# क्लासी, गुलाबी अन् बोल्ड!

## खुशी कपूरचं 'व्हिंटेज' सौंदर्य



नवोदित कलाकार खुशी कपूर ही 'द आर्चीज' सिनेमापासून वेदांग रैनाशी रिलेशनशिपमध्ये होती. पण काही दिवसांपूर्वीच अचानक त्यांचं ब्रेकअप झाल्याच्या बातम्या सुरु झाल्या. अनेक इव्हेंट्समध्ये दोघे हातात हात घालून यायचे. मात्र आता त्यांचं ब्रेकअप झाल्याची चर्चा आहे. त्यांचं दोन वर्षांचं नातं अचानक संपलं, याचा चाहत्यांनाही धक्का बसला. खुशी ही निर्माते बोनी कपूर यांची धाकटी लेक. तिची मोठी बहीण जान्हवी कपूर सौंदर्य आणि मादकतेत अव्वल आहे. खुशीही आता तिच्याच पावलावर पाऊल टाकताना दिसतेय. खुशी कपूरने नुकताच एक खास फोटोशूट इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. यामध्ये खुशी कपूर एक अतिशय ग्लॅमरस आणि 'विंटेज' लूक मध्ये दिसत आहे.

खुशीने गुलाबी रंगाचा कॉर्सेट टॉप घातला आहे, ज्यावर सुंदर फ्लोरल प्रिंट आहे. सोबत काळ्या जाळीदार पट्ट्या असून ते 'कोक्वेट' फॅशनचे एक उत्तम उदाहरण आहे. तिने या कॉर्सेट टॉपला साजेशी अशी मॅचिंग फ्लोरल प्रिंटची शॉर्ट्स परिधान केली आहे, ज्यामुळे हा एक स्टायलिश सेट दिसत असून चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहे. फोटोची बॅकग्राउंडही आऊटफिटला मॅच होणारी आहे. भिंतीचा गुलाबी रंग, मागचे कुत्र्याचे पेंटिंग या साऱ्या गोष्टींमुळे फोटोला एक वेगळा आणि 'क्लासी' फील आला आहे.

# नयनताराने गुंतवले कोट्यवधी



दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री नयनतारा आणि तिचे पती तसेच दिग्दर्शक विग्नेश शिवन पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. यावेळी त्यांच्या चित्रपटामुळे नव्हे, तर त्यांनी चेन्नईमध्ये विकत घेतलेल्या महागड्या आलिशान घरामुळे ते चर्चेचा विषय ठरले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार या दाम्पत्याने चेन्नईतील पॉश परिसरात सुमारे ३१.५ कोटी रुपयांचे लक्झरी डुप्लेक्स अपार्टमेंट खरेदी केले आहे.

मीडिया रिपोर्टनुसार नयनतारा आणि विग्नेश शिवन यांनी चेन्नईतील टेयनामपेट परिसरात असलेल्या 'लेगेसी' या प्रीमियम निवासी प्रकल्पात हे अपार्टमेंट घेतले आहे. हा प्रकल्प शहरातील प्रतिष्ठित आणि महागड्या परिसरांपैकी एक मानला जातो. त्यामुळे या घराची किंमतही मोठी असल्याचे सांगितले जाते. हे आलिशान डुप्लेक्स अपार्टमेंट इमारतीच्या चौथ्या आणि पाचव्या मजल्यावर आहे.

आधुनिक सोयीसुविधा, आकर्षक डिझाइन आणि प्रशस्त जागा यामुळे ही मालमत्ता विशेष ठरते. या घराचा सुपर बिल्ट-अप एरिया सुमारे १४,३६९ चौरस फूट असल्याची माहिती समोर आली आहे. याशिवाय या प्रॉपर्टीसोबत ५,३०८ चौरस फूट गार्डन एरिया देखील आहे, ज्यामुळे या घराचे आकर्षण आणखी वाढते. रिपोर्टनुसार या प्रॉपर्टीची किंमत सुमारे ३१.५ कोटी रुपये आहे. म्हणजेच या घराची प्रति चौरस फूट किंमत सुमारे २१,९४६ रुपये इतकी ठरते. त्यामुळे ही प्रॉपर्टी चेन्नईतील महागड्या घरांपैकी एक मानली जात आहे.

## 'ल्यारी'चा नवा बादशहा कोण?

# 'धुरंधर द रिव्हेंज'चा ट्रेलर रिलीज




धुरंधर- द रिव्हेंज अर्थात धुरंधरच्या दुसऱ्या भागाच्या ट्रेलरची सगळेजण आतुरतेने वाट पाहत होते. अखेर दिग्दर्शक आदित्य धरने नुकताच 'धुरंधर २'चा जबरदस्त ट्रेलर लॉन्च केला आहे. ट्रेलरमध्ये अनेक हिंट्स मिळतील असा प्रेक्षकांना अंदाज होता. पण, धुरंधरच्या टीमने मोठ्या हुशारीने या ट्रेलरमध्ये काहीच रिव्हिल केलेलं नाहीये.

बडे साहब कोण असेल? अक्षय खन्ना दुसऱ्या भागात झळकणार की नाही यापैकी कोणत्याच प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना ट्रेलर पाहून मिळणार नाहीयेत. मात्र, तरीही हा ३ मिनिटं २५ सेकंदाचा ट्रेलर तुम्हाला पहिल्या सेकंदापासून ते शेवटपर्यंत खिळवून ठेवतो. ट्रेलरची सुरुवात पहिल्या भागातील काही सीन्सने होते. यानंतर रहेमान डकैतचा मृत्यू झाल्यावर 'ल्यारी'चा नवा बादशहा नेमका कोण होणार? याकडे लक्ष केंद्रीत केलं जातं.

रहेमानच्या मृत्यूनंतर ल्यारीतील परिस्थिती पूर्णपणे बिघडते. खून, रक्तपात, दंगली होतात आणि शेवटी ल्यारीचा बादशहा हमजा अली मजारी होणार की रहेमानचा भाऊ उझैर बलोचकडे सत्ता जाणार यावर प्रश्नचिन्ह निर्माण होतं. आता ल्यारीचा बादशहा कोण होणार हे चित्रपट प्रदर्शित झाल्यावरच स्पष्ट होईल. पण, यानंतर एक खास वाक्य सर्वांचं लक्ष वेधून घेतं ते म्हणजे...INTRODUCING जसकीरत सिंग रंगी! हमजाची खरी ओळख...तो भारताचा गुप्तहेर म्हणून पाकिस्तानमध्ये वावरत असतो. आता जसकीरत सिंग रंगी नेमका कोण आहे, हमजाचा भूतकाळ काय होता? याचीही झलक प्रेक्षक या सिनेमात पाहायला मिळेल.

रणवीरचा खतरनाक अंदाज या ट्रेलरमध्ये पाहायला मिळतोय. पहिला भाग प्रदर्शित झाल्यावर सर्वांनी अक्षय खन्नाचं भरभरून कौतुक केलं होतं. पण, दुसऱ्या भागात रणवीर सिंहला कोणीही दुर्लक्षित करु शकणार नाही अशा प्रतिक्रिया सध्या सिनेप्रेमींकडून येऊ लागल्या आहेत. संजय दत्त, अर्जुन रामपाल, आर माधवन यांच्या भूमिकांनीही ट्रेलरमध्येच सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. पण, बडे साहब नेमका कोण आहे याची कोणतीही हिंट या ट्रेलरमध्ये दिलेली आहे. दरम्यान, १९ मार्च २०२६ रोजी संपूर्ण जगभरात 'धुरंधर २' प्रदर्शित होईल. या सिनेमाचं दिग्दर्शन आदित्य धरने केलं असून ज्योती देशपांडे आणि लोकेश धर या सिनेमाचे निर्माते आहेत.

# मिस मद्रास ते दाक्षिणात्य सिनेसृष्टीची 'क्वीन'



दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री त्रिशा कृष्णन सध्या पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. तमिळ सुपरस्टार थलपती विजय याच्या वैयक्तिक आयुष्याशी तिचं नाव जोडलं जात असल्यामुळे सोशल मीडियावर आणि मनोरंजन विश्वात अनेक चर्चा रंगल्या आहेत. विजयच्या पत्नीने घटस्फोटासाठी अर्ज केल्याची बातमी समोर आल्यानंतर या चर्चांना अधिकच उधाण आलं आहे.

त्रिशा कृष्णनचा जन्म ४ मे १९८३ रोजी चेन्नई येथे झाला. तिने चेन्नईतील एथिराज कॉलेजमधून बीबीएचे शिक्षण पूर्ण केले आहे. अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी त्रिशाने मॉडेलिंगमध्ये आपली ओळख निर्माण केली. १९९९ साली तिने 'मिस मद्रास' हा किताब जिंकला आणि तिथूनच तिच्या करिअरला वेगळी दिशा मिळाली.

त्रिशाने आपल्या करिअरची सुरुवात छोट्या भूमिकेतून केली. १९९९ मध्ये आलेल्या 'जोडी' या चित्रपटात ती झळकली होती. त्यानंतर २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मौनम पेसियाधे' या चित्रपटातून ती मुख्य अभिनेत्री म्हणून प्रेक्षकांसमोर आली. या चित्रपटानंतर त्रिशाला मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळू लागली.

यानंतर तिने अनेक यशस्वी चित्रपटांमध्ये काम केले. 'घिल्ली' या चित्रपटात तिने थलपती विजयसोबत काम केले होते आणि हा चित्रपट सुपरहिट ठरला. त्यानंतर 'तिरुपाची', 'आथी', 'कुरुवी' आणि अलीकडील 'लिओ' या चित्रपटांमध्येही विजय आणि त्रिशा एकत्र दिसले. काही काळ त्यांनी एकत्र काम केले नव्हते, मात्र 'लिओ'नंतर दोघांबद्दलच्या चर्चांना पुन्हा सुरुवात झाली.

# भारत-न्यूझीलंडमध्ये आज 'महामुकाबला'

## अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार अंतिम सामना

महाईन्यूज । अहमदाबाद

**भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांनी फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आता दोन्ही संघांकडे इतिहास घडवण्याची संधी असणार आहे. न्यूझीलंडला आतापर्यंत जेतेपदाची एकही ट्रॉफी उंचावता आलेली नाही. त्यामुळे न्यूझीलंडचा संघ पहिली ट्रॉफी जिंकण्याच्या प्रयत्नात असणार आहे. तर दुसरीकडे भारतीय संघाने चौथ्यांदा या स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला आहे.**




यादरम्यान २ वेळा जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्याची संधी असणार आहे. आजवर कुठल्याही संघाला ३ वेळा जेतेपदाची ट्रॉफी उंचावता आलेली नाही. त्यामुळे हा देखील मोठा रेकॉर्ड असणार आहे. तसेच मायदेशात खेळताना कुठलाही संघ जेतेपदाची ट्रॉफी उंचावू शकलेला नाही. त्यामुळे भारतीय संघाला हा रेकॉर्ड देखील आपल्या नावावर करण्याची संधी असणार आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणारा फायनलचा सामना रविवारी ८ मार्चला खेळवला जाणार आहे. हा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणारा फायनलचा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. तर नाणेफेक संध्याकाळी ६:३० वाजता होणार आहे. त्याआधी संध्याकाळी ५:३० वाजता पॉप स्टार रिकी मार्टीनचा शो असणार आहे.

### वर्ल्डकप विजेत्याला किती कोटींचं बक्षीस?

आयसीसीने टी-२० वर्ल्डकप २०२६ साठी एकूण १३.५ मिलियन डॉलर्स (सुमारे १२३.७७ कोटी रुपये) इतकी बक्षीस रक्कम जाहीर केली आहे. ही रक्कम २०२४ च्या स्पर्धेपेक्षा सुमारे २० टक्क्यांनी अधिक आहे. स्पर्धेतील विजेत्या संघाला ३ मिलियन डॉलर्स (सुमारे २७.५० कोटी रुपये) बक्षीस मिळणार आहे, तर उपविजेत्या संघाला १.६ मिलियन डॉलर्स (सुमारे १४.६७ कोटी रुपये) दिले जाणार आहेत. याशिवाय सेमीफायनलमध्ये पराभूत झालेल्या संघांना ०.७९ मिलियन डॉलर्स (सुमारे ७.२४ कोटी रुपये) मिळणार आहेत. तसेच स्पर्धेत ५ ते १२ व्या स्थानावर असलेल्या संघांना ०.३८ मिलियन डॉलर्स (३.४८ कोटी) आणि १३ ते २० व्या स्थानावरील संघांना ०.२५ मिलियन डॉलर्स (२.२९ कोटी) इतकी रक्कम दिली जाणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत सहभागी सर्व २० संघांना आयसीसीकडून आर्थिक मानधन मिळणार आहे.

# नागपूरची दिव्या देशमुख महिला बुद्धिबळ क्रमवारीत टॉप-१०मध्ये

महाईन्यूज । मुंबई

**नागपूरची बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिने महिला शास्त्रीय बुद्धिबळाच्या (क्लासिकल) थेट जागतिक क्रमवारीत प्रथमच अव्वल दहामध्ये स्थान मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. प्राग (झेक प्रजासत्ताक) येथे झालेल्या 'प्राग चेस चॅलेंजर्स २०२६' स्पर्धेत तिने तिसरे स्थान पटकावले. या कामगिरीमुळे तिचे थेट रेटिंग २५०९.६ इतके झाले असून दोन स्थानांची झेप घेत ती जागतिक क्रमवारीत दहाव्या स्थानावर पोहोचली आहे.**





या स्पर्धेत २० वर्षीय दिव्याने एकूण ९ डावांपैकी २ विजय आणि ६ बरोबरी साधत ५ गुण मिळवले. अंतिम फेरीत तिने झेक प्रजासत्ताकच्या स्टेपन हर्बेक याच्यावर काळ्या मोहऱ्यांनी खेळताना मात करत स्पर्धेचा शेवट दमदार विजयाने केला. सातत्यपूर्ण आणि संयमी खेळामुळे या स्पर्धेत तिची कामगिरी विशेष ठरली.

स्पर्धेदरम्यान तिने अनेक मजबूत प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध बचावात्मक आणि आक्रमक अशा दोन्ही प्रकारच्या डावपेचांचा प्रभावी वापर करत आपली परिपक्वता दाखवून दिली.

महिला शास्त्रीय बुद्धिबळाच्या सध्याच्या थेट जागतिक क्रमवारीत होउ यीफान (चीन) २५९६ गुणांसह अव्वल स्थानी आहे. त्यानंतर लेई तिंगजिये (चीन) दुसऱ्या, जू वेनजुन (चीन) तिसऱ्या आणि झू जिनेर (चीन) चौथ्या स्थानावर आहेत. भारताची अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी २५३५ गुणांसह पाचव्या क्रमांकावर आहे. तसेच तान झोंगयी (चीन), अलेक्झांड्रा गोर्याच्किना, ॲना मुझिचुक (युक्रेन) आणि बिबिसारा अस्सौबायेवा (कझाकस्तान) या खेळाडूंचाही अव्वल दहामध्ये समावेश आहे. या यादीत आता दिव्या देशमुखचा समावेश झाल्यामुळे भारतीय महिला बुद्धिबळाला नवी उंची मिळाल्याचे मानले जात आहे.

दिव्या देशमुखचा जन्म नागपूर येथे झाला असून तिने लहान वयातच बुद्धिबळ क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. तिचे वडील जितेंद्र देशमुख आणि आई नम्रता देशमुख यांनी लहानपणापासूनच तिच्या बुद्धिबळातील आवडीला प्रोत्साहन दिले. शालेय वयातच तिने राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सातत्याने पदके जिंकण्यास सुरुवात केली.

२०२२ मधील बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारत 'बी' संघाकडून खेळताना तिने संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. याशिवाय तिने अनेक आशियाई आणि जागतिक युवा स्पर्धांमध्येही उल्लेखनीय कामगिरी करत भारताचा झेंडा उंचावला आहे. तिच्या सातत्यपूर्ण प्रगतीमुळे ती भारतातील उदयोन्मुख महिला ग्रँडमास्टर्सपैकी एक म्हणून ओळखली जाते.

अलीकडील काळात दिव्याच्या खेळात मोठी परिपक्वता दिसून येत असून ती आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवी खेळाडूंनाही कडवी टक्कर देताना दिसते. प्रागमधील या यशामुळे जागतिक क्रमवारीत अव्वल दहामध्ये पोहोचणाऱ्या भारतातील तरुण बुद्धिबळपटूंमध्ये तिची गणना होऊ लागली आहे. त्यामुळे येत्या काळात जागतिक स्पर्धांमध्ये तिच्याकडून आणखी मोठ्या यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
दि. 08 मार्च 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# श्रीक्षेत्र आळंदी यात्रेकरिता अनुदान वाढीसाठी मुख्यमंत्र्यांना ‘साकडे’!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची निवेदनाद्वारे मागणी

## नगरपरिषदेवरील आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या धार्मिक यात्रांसाठी आवश्यक खर्च वाढत असताना सध्याचे शासकीय अनुदान अपुरे पडत असल्याने ते वाढवण्याची मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी सविस्तर पत्र पाठवून आळंदी नगरपरिषदेवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली आहे.**



आमदार लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे की, आळंदी नगरपरिषदेला सध्या यात्राकराच्या स्वरूपात केवळ १.६२ कोटी रुपयांचे अनुदान मिळते. मात्र, सन २०२३–२४ या कालावधीत यात्रेसाठी नगरपरिषदेला तब्बल २.७३ कोटी रुपयांचा खर्च करावा लागला. परिणामी, सुमारे १.११ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च नगरपरिषदेच्या स्वतःच्या निधीतून करावा लागला आहे. त्यामुळे नगरपरिषदेवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे.

याच आर्थिक तणावामुळे नगरपरिषदेची वीज देयके आणि शासकीय पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याचेही त्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. यात्रेच्या व्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणावर स्वच्छता, प्रकाशयोजना, पाणीपुरवठा, वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा व्यवस्था उभारावी लागते. मात्र सध्याचे अनुदान या खर्चासाठी अपुरे ठरत असल्याने नगरपरिषदेला वारंवार स्वतःच्या निधीवर ताण येत आहे.

दरम्यान, संतश्रेष्ठ महाराजांचा संजीवन समाधी सोहळा होणार असून, या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी श्रीक्षेत्र आळंदी येथे येणार आहेत. त्यामुळे शहरातील पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार लांडगे यांनी अधोरेखित केले आहे. आळंदी नगरपरिषद प्रशासनानेही यासंदर्भात राज्य शासनाच्या नगरपरिषद संचालनालयाकडे अनुदान वाढीचा प्रस्ताव पाठवला असल्याची माहिती त्यांनी दिली. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेचे कामकाज सुरळीत आणि सक्षमपणे चालण्यासाठी यात्रा अनुदानात वाढ करण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने योग्य आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

> “श्रीक्षेत्र आळंदी हे वारकरी संप्रदायाचे पवित्र तीर्थक्षेत्र असून दरवर्षी लाखो भाविक येथे येत असतात. त्यामुळे यात्रेच्या काळात स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशयोजना आणि सुरक्षेसाठी नगरपरिषदेला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. सध्याचे शासकीय अनुदान अपुरे पडत असल्याने ते वाढवणे आवश्यक आहे. या संदर्भात मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली असून, आळंदी नगरपरिषदेला सक्षमपणे काम करता यावे आणि भाविकांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असा मला विश्वास आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**



# Dr. Bhagyashree Patil: Leadership Rooted in Compassion and Social Transformation!

Championing healthcare, women empowerment, sustainable agriculture, and a greener future.

**MahaEnews** I PUNE



**ON THE OCCASION OF INTERNATIONAL WOMEN'S DAY, IT IS IMPORTANT TO RECOGNISE LEADERS WHO COMBINE VISION WITH SERVICE TO SOCIETY. DR. BHAGYASHREE PATIL, A DISTINGUISHED ENTREPRENEUR, EDUCATIONIST, AND SOCIAL LEADER FROM PUNE, IS ONE SUCH INSPIRING PERSONALITY WHOSE WORK SPANS EDUCATION, HEALTHCARE, BIOTECHNOLOGY, AGRICULTURE, AND WOMEN EMPOWERMENT.**

Dr. Patil serves as the Chancellor of Dr. D. Y. Patil Dnyan Prasad University and Pro-Chancellor of Dr. D. Y. Patil Vidyapeeth, Pimpri,Pune where she continues to strengthen institutions dedicated to academic excellence, research, and the holistic development of students and patients.

Her contribution to healthcare is equally significant.

With her vision and guidance, the transplant department at Dr. D. Y. Patil Medical College, Hospital & Research Centre has developed into a centre of excellence. By bringing together highly skilled doctors, surgeons, and a compassionate medical team under one roof, the department has successfully performed numerous life-saving transplant procedures, giving hope and a new lease of life to many patients and their families.

Dr. Patil is also the Founder Chairperson and Managing Director of Rise N Shine Biotech Pvt. Ltd., a leading plant biotechnology and tissue culture company. Through this initiative, she has been actively promoting modern agriculture, floriculture and horticulture, encouraging farmers to cultivate fresh flowers, fruits that create better income opportunities while supporting India's growing floriculture industry.

A strong advocate of women empowerment, she has created employment opportunities for a large number of women from rural communities from 18–20 nearby villages, helping them achieve financial independence and dignity through skill development and sustainable livelihoods.

She also emphasizes the importance of emotional strength and mental balance for women, encouraging counselling and guidance initiatives that help women build confidence and resilience in their personal and professional lives.

Dr. Patil is equally passionate about environmental responsibility. She strongly advocates for a plastic-free earth, promoting sustainable practices and encouraging communities to adopt eco-friendly alternatives that protect the environment for future generations.

> "EMPOWERED WOMEN BUILD EMPOWERED FAMILIES, STRONG COMMUNITIES, AND A BETTER WORLD — AND TRUE LEADERSHIP IS ABOUT CREATING OPPORTUNITIES WHERE EVERYONE CAN GROW WITH DIGNITY."

Her outstanding work has been recognised with several prestigious honours, including the Vishalakshi Award at the International Women's Conference, the Vasantrao Naik Agricultural Award, and the Nari Shakti Award for her contributions to healthcare and women empowerment.

Through her work in education, healthcare, agriculture, and social welfare,

Dr. Bhagyashree Patil continues to inspire a new generation of women leaders. Her journey reflects a powerful message — that true leadership lies in empowering people, nurturing nature, and building a compassionate and progressive society.



# मराठीचा वारसा जपला पाहिजे: डॉ. धारवाडकर

## शिक्षण विश्व : ‘एसबीपीआयएम’ मध्ये मराठी भाषा गौरव, शिव जयंती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. मराठी संतांनी आपल्या भजन, प्रवचन, कीर्तन, व्याख्यान, कथा, नाटक, कादंबऱ्या, कवितासंग्रह तसेच इतिहास संशोधकांच्या बखर, प्रवास वर्णन, आत्मचरित्र अशा विविध साहित्यातून समाजाचे प्रबोधन करून अंधश्रद्धेवर प्रहार केले. यामुळे मराठी भाषा अधिक समृद्ध झाली. आपल्या भाषेचा हा समृद्ध वारसा आपण जपला पाहिजे असे मार्गदर्शन एसबीपीआयएम संस्थेच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी केले.**





मराठी भाषा गौरवदिन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एसबीपीआयएम महाविद्यालय येथील ग्रंथालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस एसबीपीआयएम संस्थेच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. योगेंद्र देवकर, युवा शाहीर शुभम भुतकर, प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आदी उपस्थित होते. युवा शाहीर शुभम भुतकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर वर पोवाडा सादर केला. प्रा. स्वाती सातपुते, विद्यार्थीनी अनघा कुलकर्णी यांनी समन्वयक म्हणून काम केले.

सूत्रसंचालन हर्षदा पाटील यांनी केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी शिक्षक, विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरवदिन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

> **“महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. मराठी संतांनी आपल्या भजन, प्रवचन, कीर्तन, व्याख्यान, कथा, नाटक, कादंबऱ्या, कवितासंग्रह तसेच इतिहास संशोधकांच्या बखर, प्रवास वर्णन आणि आत्मचरित्राद्वारे समाजाचे प्रबोधन केले. यामुळे मराठी भाषा अधिक समृद्ध झाली. आपल्या भाषेचा हा अमूल्य वारसा आपण जपला पाहिजे, तो पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे.”**
> **— डॉ. किर्ती धारवाडकर, एसबीपीआयएम संस्थेच्या संचालिका.**



# ‘पीसीसीओईआर’ची राष्ट्रीय हॅकेथॉनमध्ये धडक!

## शिक्षण विश्व: "टीम तटरक्षक" ने पटकावला प्रथम क्रमांक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय तंत्रज्ञान संस्था, कानपूर आणि जेएसडब्ल्यू ग्रुप ऑफ इंडियाच्या सहकार्याने आयआयटी कानपूर येथे आयोजित राष्ट्रीय हॅकेथॉन स्पर्धेत पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) च्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या “टीम तटरक्षक” ने प्रथम क्रमांक पटकावला.**




देशभरातून ३०० पेक्षा अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयातील संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. विजेत्या संघात अभिषेक गिरी, वैशाख आनंद एम, माहेक फातन, सृष्टी सावळी यांचा समावेश होता.

विजेत्या संघाला मार्गदर्शन केले पीसीसीओईआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. समीर सावरकर, आणि आरएनडी प्रमुख डॉ. सुदर्शन बोबडे यांनी. त्याचबरोबर पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तसेच पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या संघाचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. पीसीसीओईआरच्या टीम तटरक्षकची ही यशस्वी कामगिरी विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि प्रकल्प प्रत्यक्षात उतरवण्याच्या क्षमतेचे प्रतिक आहे.



### “इनोवेशन इन रेझिलियनट इन्फ्रास्ट्रक्चर”

टीम तटरक्षकने सादर केलेल्या प्रकल्पाचे शीर्षक होते “इनोवेशन इन रेझिलियनट इन्फ्रास्ट्रक्चर”, ज्यामध्ये मजबूत तांत्रिक पायाभूत रचना, नाविन्यपूर्ण डिझाईन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीची क्षमता यांचा समावेश होता. या प्रकल्पाचा उद्देश होता ‘किनारपट्टीवरील पूरपरिस्थिती आणि हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या आपत्तींचा परिणाम कमी करण्यासाठी पर्यावरणीय बुद्धिमत्ता आणि संरचनात्मक अभियांत्रिकी तत्त्वांचा समन्वय साधून शाश्वत पायाभूत सुविधा विकसित करणे’. स्पर्धेत प्रकल्पांचे सखोल तांत्रिक परीक्षण, दस्तऐवजीकरण पडताळणी, व्यवहार्यता विश्लेषण, नूतन उपक्रम मूल्यांकन तसेच व्यावसायिक विस्तारक्षमतेचे परीक्षण अशा कठोर निकषांवर केले गेले.

